# शिक्षणाचा वापर प्रत्यक्ष जीवनात होणे आवश्यक- डॉ. राजेंद्र कुंभार

"महाविद्यालयीन जीवनामध्ये केवळ पाठ्यपुस्तकी ज्ञान घेऊन रोजगार उपलब्ध होत नाही व केवळ नोकरी पुरते शिक्षण न घेता त्याचा वापर प्रत्यक्ष जीवनात विद्यार्थ्यांनी करायला हवा. केवळ नोकरदार होण्याऐवजी नोकरी देणारे, रोजगार निर्माण करणारे यशस्वी उद्योजक बनण्यासाठी विद्यार्थ्यांनी प्रयत्न करायला हवेत. त्यासाठी जे काही शिक्षण आपण घेत असतो त्या शिक्षणाचा वापर आपल्या प्रत्यक्ष जीवनात करायला हवा" असे मार्गदर्शनपर उद्गार जयसिंगपूर महाविद्यालय, जयसिंगपूर येथील माजी प्राचार्य डॉ. राजेंद्र कुंभार यांनी काढले. ते श्री व्यंकटेश महाविद्यालय, इचलकरंजी येथे अर्थशास्त्र विभाग अंतर्गत आयोजित 'डॉ. मनमोहन सिंग आणि भारतीय अर्थव्यवस्था ' या विषयावर आधारित चर्चासत्रात बोलत होते. देशाच्या फाळणी प्रसंगी पंजाब प्रांतात येऊन अगदी गरीब परिस्थितीतून शिक्षण घेत डॉक्टर पदवी, अर्थतज्ञ, रिझर्व बँकेचे गव्हर्नर, प्रमुख अर्थ समित्यांचे सचिव, अर्थमंत्री आणि भारत देशाचे पंतप्रधान असा प्रदीर्घ प्रवास करणारे व उत्तुंग यश संपादित करणारे अनेक महत्त्वाची पदे भूषवणारे अर्थतज्ञ, अर्थनीतीकार डॉ. मनमोहन सिंग यांनी 1991 च्या एलपीजी धोरणाचा अवलंब करून अर्थव्यवस्थेला संकटातून तारले. क्रांती घडवून आणणारे अभ्यसू व्यक्तिमत्व, उच्च पदावर राहून देखील कधीही आपला नम्रपणा न सोडणारे मनमोहन सिंग यांनी देशातील गरिबातल्या गरीब व्यक्तीला नजरेसमोर ठेवून अर्थसंकल्प आखण्याची भूमिका पार पाडली. अर्थनीती ठरवत असताना देशाला बेरोजगारीतून मुक्त करण्यासाठी, गरिबी हटवण्यासाठी अनेक अर्थसंकल्पीय तरतुदी त्यांनी केल्या. गरीब-श्रीमंत दरी कमी करून समांतर अर्थव्यवस्था निर्माण करण्यास त्यांनी नेहमी प्राधान्य दिले. असे हे विनम्र व्यक्तिमत्व आपल्या देशाच्या अर्थव्यवस्थेच्या मजबुतीकरणासाठी व सक्षम बनवण्यासाठी मोलाचे योगदान दिले आहे असे ते म्हणाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उप-प्राचार्य डॉ. बी. एन. कांबळे हे उपस्थित होते. देशाला आर्थिक मजबुती मिळवून देण्यासाठी, आर्थिक संकटांमधून भारतीय अर्थव्यवस्था सक्षम व भक्कम करण्यासाठी मनमोहन सिंग यांनी मोलाची भूमिका पार पाडली. खरे अभ्यासू अर्थतज्ञ म्हणून ख्याती असणारे डॉ. मनमोहन सिंग यांना भावपूर्ण श्रद्धांजली प्रित्यर्थ सदर चर्चासत्र आयोजित करण्यात आल्याचे त्यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगत सांगितले. चर्चासत्राच्या सुरुवातीस अर्थशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख प्रा. श्री. डी. बी. पवार यांनी प्रास्ताविक केले. प्रमुख पाहुण्यांची ओळख व आभार प्रदर्शनाची जबाबदारी अनुक्रमे डॉ. एस. आर. ठाकर व डॉ. डी. एस. कांबळे यांनी पार पाडली. चर्चासत्रासाठी मोठ्या प्रमाणात विद्यार्थी, विद्यार्थिनी प्राध्यापक व प्राध्यापके तर कर्मचारी वर्ग उपस्थित होते.


Shri N.G. Education Society's
Shri Venkatesh Mahavidyalaya Ichalkaranji
Economics Association Organizes
Guest lecture on
"Dr. Manmohan Singh and Indian Economy"
chief Guest - Dr Rajendra Kumbhar
Shri Venkatesh Mahavidyalaya,